॥ सहकारातून समाजकार्य । आम्ही बांधीले शिरोधार्य ॥

# शिव समर्थ

## सहकारी पतपेढी लि. ऐरोली, नवी मुंबई

नोंदणी क्र.: टी.एन.ए. (टी.एन.ए.) आर.एस.आर.(सी.आर.) 321/1987-88
ISO/ आय. एस. ओ. मानांकन प्राप्त संस्था-9001-2015

# परंपरेतून जपला सहकार,
# प्रगतीच्या नव्या पर्वाची डिजिटल वाटचाल




३९ वा

## वार्षिक अहवाल

२०२५-२०२६

ऑडिट वर्ग 'अ'

# संचालक मंडळ



श्री. मधुकर मो. पाटील
अध्यक्ष



श्री. शिरिष तुळशिराम चौधरी
उपाध्यक्ष



श्री. सावकार भाऊ गुंजाळ
संचालक



श्री. दिपक काशिनाथ जोगी
संचालक



श्री. डेनसिंग अरोकीयादास
संचालक



श्री. आदित्य मधुकर पाटील
संचालक



श्री. दिशीत जगदिश ठक्कर
संचालक



श्री. गणेश सुखदेव आघाव
संचालक



श्री. विजय निवृत्ती जाधव
संचालक



सौ. मृणाली विजय चौधरी
संचालिका



सौ. सोनल अरविंद पानस्कर
संचालिका



श्री. विश्वनाथ अ. साळवी
तज्ञ संचालक



श्री. रोहिदास अ. मढवी
तज्ञ संचालक

## आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त कार्यक्रम

आठ मार्च या जागतिक महिला दिनानिमित्त शिव समर्थ सहकारी पतपेढीच्या वतीने महिला सभासदांसाठी आर्थिक साक्षरता आणि कर्करोग जनजागृती या दोन विषयांवर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास आपल्या महिला सभासदांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून, चांगला प्रतिसाद दिला.














सन २०२६ दिनदर्शिका प्रकाशन सोहळा

## गुणगौरव समारंभ २०२६

२०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक, उच्च माध्यमिक, पदवी/पदविका आणि पदव्युत्तर पदवी परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या सभासदांच्या पाल्यांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन ! या यशवंत विद्यार्थ्यांपैकी ७०: टक्क्याहून जास्त गुण प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव व कौतुक समारंभ दिनांक ११ जुलै २०२६ रोजी, करण्यात आला. या निमित्ताने ‘शिक्षण व व्यवसाय मार्गदर्शन शिबिर’ घेण्यात आले. याकरिता ज्येष्ठ मानसोपचार तज्ञ कै. आनंद नाडकर्णी यांचे सहकारी मानसोपचार तज्ञ श्री. अरूण नाईक यांनी उपस्थित विद्यार्थी आणि पालकांना मार्गदर्शन केले आणि त्यांच्या मनातील करिअर विषयीच्या प्रश्नांचा सविस्तर उत्तरे दिली. या कार्यक्रमाला भरघोस प्रतिसाद मिळाला.
















# शिव समर्थ सहकारी पतपेढी लि.

## ३९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(फक्त सभासदांकरिता)**

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की,संस्थेची ३९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दि. २२ ऑगस्ट २०२६ रोजी, सायं. ठीक ०४.०० वाजता श्रीमती जानकीबाई कृष्णा मढवी मंगल कार्यालय, सेक्टर -५, ऐरोली, नवी मुंबई येथे खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली आहे, तरी सर्व सभासदांनी वेळेवर सभेस हजर रहावे, ही विनंती.

## सभेपुढील विषय

१. दिनांक २६ जुलै २०२५ रोजी झालेल्या ३८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे व दिनांक ११ ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या अधिमंडळाच्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२. दिनांक ३१ मार्च २०२६ अखेरचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रकास मान्यता देणे.

३. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या नफा विभागणीस मंजुरी देऊन लाभांश जाहिर करणे.

४. सन २०२५-२०२६ या वर्षाचा अंतर्गत व वैधानिक लेखापरीक्षकांचा अहवाल वाचून मंजूर करणे.

५. सन २०२४-२०२५ सालचा दोष दुरुस्ती अहवाल सादर करणे व त्यास मंजुरी देणे.

६. सन २०२६ -२०२७ च्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.

७. सन २०२६ -२०२७ या वर्षासाठी अंतर्गत व वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

८. संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची माहिती देणे व नोंद घेणे.

९. वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणीत केल्यानुसार कर्ज खाते निर्लेखन प्रस्तावास मान्यता देणे.

१०. संस्थेचे कर्मचारी सेवा नियम, ठेव नियम याबाबतच्या धोरणांना मान्यता देणे.

११. वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित सभासदांची अनुपस्थिती क्षमापीत करणे.

१२. कळवा ता.ठाणे येथे नवीन शाखा सुरू करणेबाबत मंजुरी देणे.

१३. मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे.

स्थळ : ऐरोली, नवी मुंबई

**दिनांक : ०१/०८/२०२६**

संचालक मंडळाच्या वतीने

**श्री. प्रदिप पां. गोळे**

व्यवस्थापक

## विशेष सूचना

१. गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास, सदर वार्षिक सर्वसाधारण सभा त्याचदिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. या सभेला गणसंख्यापूर्तीचे बंधन राहणार नाही.

२. दि. २२ ऑगस्ट २०२६ रोजी, होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळी सभासदांना काही सूचना करावयाच्या असतील तर त्यांनी त्या दि. १४ ऑगस्ट २०२६ पर्यंत संस्थेच्या कार्यालयाच्या कामकाजाच्या वेळेत (सकाळी १०.०० ते सायं ६.३०) लिखीत स्वरूपात द्याव्यात किंवा ई-मेल द्वारे पाठवाव्यात जेणे करून आपल्या सुचनांची नोंद घेऊन त्यावर भाष्य करणे शक्य होईल. (ई-मेल sspl.ho1@gmail.com)

३. कृपया आपले दि. ३१/०३/२०२६ पर्यंतचे सभासद भाग दाखले घेऊन जावेत.

## अध्यक्षांचे मनोगत....

माननीय सभासद, बंधू आणि भगिनींनों,

शिव समर्थांना स्मरून

सस्नेह नमस्कार !

संस्थेच्या ३९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित असलेल्या आपणा सर्वांचे हार्दिक स्वागत. संचालक मंडळाच्या वतीने आपल्या संस्थेचा सन २०२५-२६ चा आर्थिक वर्षातील कामगिरीचा अहवाल मी आपणांसमोर सादर करीत आहे.

सर्व प्रथम आपली संस्था आता ४० व्या वर्षात पदार्पण करीत आहे. त्याबद्दल आपले अभिनंदन आणि धन्यवाद ! चाळीशीचा हा टप्पा स्थैर्य व सामर्थ्य प्रतीत करतो. आपल्या सर्वांचे सहकार्य तसेच ''पारदर्शकता, नितीमत्ता, आधुनिकता आणि आर्थिक सामर्थ्य'' या मूल्यांच्या भक्कम आधारावर आपण दमदार वाटचाल करीत येथ पर्यंत पोहोचलो आहोत. याचेच फलित म्हणून महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन यांच्याकडून आपल्याला उत्कृष्ट कामकाजाकरिता 'दिपस्तंभ' हा मानाचा पुरस्कार मिळालेला असून उत्तम कामकाजाचे प्रतिक म्हणून संस्थेस 'आय.एस.ओ.' (ISO) मानांकन प्राप्त झालेले आहे.

यावर्षी देखील संस्थेने उत्तम कामगिरी केलेली आहे. योग्य प्रकारे केलेल्या नियोजनामुळेच संस्थेने संमिश्र व्यवसाय ८००६.१० लाख इतका केलेला आहे. संस्थेचे अधिकृत भाग भांडवल ५ कोटी असून वसूल भाग भांडवल २७०.०० लाख आहे. संस्थेचा पाया अधिक भक्कम करण्यासाठी संस्थेचा स्वनिधी ७२६.२० लाख पर्यंत जमा आहे.सभासद व ग्राहकांना दिलेली उत्तम सेवा व जपलेले ऋणानुबंध यामुळे, तसेच सभासदांनी आपल्यावर दाखविलेल्या विश्वासामुळे यावर्षी ठेवींमध्ये ६७३.७६ लाख इतकी चांगली वाढ केलेली असून मार्च २६ अखेर आपल्या एकूण ठेवी ४५९४.६६ लाख इतक्या झालेल्या आहेत. कर्ज व्यवहारात अथवा वितरणात ३९०.६७ लाख वाढ होऊन एकूण कर्ज ३४११.४५ लाख इतके झाले आहे. कर्ज वसुली करिता सुनियोजित धोरण आखून आपली वसुली यंत्रणा सक्षम केल्यामुळे ढोबळ एन.पी.ए. प्रमाण १.८६% व नेट एन.पी.ए. प्रमाण ०% राखण्यात आपण यशस्वी ठरलो आहोत. आपली संस्था भागधारकांचे हित साधण्या बरोबरच संस्थेचा स्वनिधी वाढविण्याचा समतोल यशस्वीपणे राखून आपल्या भागदारकांना सातत्याने १०% लाभांश देत आलेली आहे. मला सांगण्यास अत्यंत आनंद होत आहे की, यावर्षी आपण तो वाढवून ११% इतका लाभांश देत आहोत. संस्थेचे कामकाज अधिकाधिक दर्जेदार होण्यासाठी संचालक व कर्मचारी वर्ग यांनी आधुनिकतेचा स्वीकार करून, नवनवीन तंत्रज्ञान व

कामकाज पध्दतीचा अंगीकार करणे आवश्यक ठरते. याकरिता आपण या संपूर्ण वर्षभरात आपल्या कामकाजात सुसूत्रता व आधुनिकता येण्यासाठी तज्ज्ञ मार्गदर्शकांद्वारे ८ प्रशिक्षण सत्रे घेतलेली आहेत. यामुळे संचालक व कर्मचारी वर्ग यांच्यामध्ये परस्पर सहकार्य वाढून संस्थेची ध्येयधोरणे यशस्वीरित्या गाठण्यासाठी, प्रेरणा निर्माण होऊन, आपण आपल्या कार्यक्षमतेत वाढ केलेली आहे. तसेच नव्या डिजिटल युगातील स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी आपणही नव्या कार्यप्रणालीचा स्वीकार करणे गरजेचे असते याकरिता आपण यावर्षी आपल्या शिव समर्थ पतपेढीचा ॲप सुरु करित आहोत. ज्याद्वारे आपण आपल्या सभासदांना डिजिटल बँकिंग सेवा देऊ शकतो.

'सहकारातून समाजकार्य- आम्ही बांधिले शिरोधार्य ! हे ब्रीदवाक्य घेऊन संस्थेची वाटचाल सुरु आहे. याला अनुसरून आपण सामाजिक उपक्रम देखील राबवत आहोत. यावर्षी ८ मार्च या 'आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त' आपण महिला मेळावा आयोजित केला. त्यामध्ये महिलांसाठी 'आर्थिक साक्षरता' आणि 'कर्करोग जनजागृती' या विषयावर तज्ज्ञांद्वारे माहिती देण्यात आली. या महिला मेळाव्यास आपल्या सभासद महिलांनी भरघोस प्रतिसाद दिला. या कार्यक्रमास वर्तमानपत्रातूनही प्रसिध्दी मिळाली व संस्थेचा नावलौकिक वाढला. यापुढेही अशीच सामाजिक बांधिलकी जपत आपल्या संस्थेची दमदार वाटचाल उत्तरोत्तर प्रगतीपथावर राहील असा मला विश्वास वाटतो. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही आपण सभासदांच्या पाल्यांचे 'गुणगौरव' समारंभात कौतुक करून त्यांना प्रोत्साहन दिले. संस्थेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कायम प्रयत्नशील राहणारे संचालक मंडळ, सभासद, कर्मचारी वर्ग, दैनंदिन ठेव प्रतिनिधी, ठेवीदार, कर्जदार व हितचिंतक यांचे सहकार्य आणि प्रोत्साहन यामुळेच आज आपली संस्था चाळीशीत स्थैर्याने उभी राहून प्रगतीची नवी शिखरे पादाक्रांत करण्यासाठी सज्ज आहे. आपल्या सर्वांच्या सहकार्यांबद्दल मी आपला आभारी आहे.

धन्यवाद !

**जय हिंद !** **जय महाराष्ट्र !** **जय सहकार !**

**श्री. मधुकर मो. पाटील**
**अध्यक्ष**

## सन २०२५-२०२६ चा संचालक मंडळाच्या कामकाजाचा अहवाल

सन्माननीय सहकारी सभासद बंधू-भगिनींनो स-स्नेह नमस्कार,

आपल्या संस्थेचा ३१ मार्च २०२६ चा ३९ वा वार्षिक अहवाल, वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेले ताळेबंद व नफा-तोटा पत्रक संचालक मंडळाच्या वतीने आपल्यापुढे सादर करताना आम्हांस आनंद होत आहे. दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुध्दा संस्थेने सहकार खात्याच्या आदर्श उपविधी प्रमाणे सर्व निकष पूर्ण करून या आर्थिक वर्षात केलेली प्रगती क्रमश: आपल्यापुढे ठेवीत आहोत.

## सन २०२५-२०२६ मधील संस्थेच्या प्रगतीची ठळक वैशिष्टये

आपल्या संस्थेची सन २०२५-२०२६ मधील आर्थिक कामगिरी उत्तम राहिली असुन संस्थेच्या ठेवीमध्ये १७.१८ टक्के व कर्जामध्ये १२.९३ टक्के वाढ होऊन एकूण व्यवहारातील वाढ १५.३३ टक्के म्हणजे रू.१०६४.४३ लाख इतकी नोंदली गेली. संस्थेच्या नफा क्षमतेत उल्लेखनिय वाढ झाली आहे. या वर्षात संस्थेच्या नफ्यात २.५७ टक्के म्हणजे रू.१.५३ लाख वाढ झाली आहे. संस्थेचे सन २०२४-२०२५ मधील एकूण उत्पन्न रू. ४४३.६६ लाख होते. त्यामध्ये चालू आर्थिक वर्षात रू. ५५.९७ लाखांची वाढ झाली असून सन २०२५-२०२६ अखेर एकूण उत्पन्न रू.४९९.७६ लाख इतके झाले आहे.

रूपये लाखात

| तपशील | ३१ मार्च २०२५ अखेर शिल्लक रू. | ३१ मार्च २०२६ अखेर शिल्लक रू. | अहवाल वर्षात झालेली | शेकडा |
|---|---|---|---|---|
| १) ठेवी | ३,९२०.९० | ४,५९४.६६ | ६७३.७६ | १७.१८ |
| २) कर्ज | ३,०२०.७७ | ३,४११.४४ | ३९०.६७ | १२.९३ |
| ३) संमिश्र व्यवसाय | ६,९४१.६७ | ८,००६.१० | १,०६४.४३ | १५.३३ |
| ४) गुंतवणूक | १,५५६.०२ | १,७७६.९६ | २२०.९४ | १४.१९ |
| ५) नफा | ५९.४९ | ६१.१५ | १.६६ | २.७९ |
| ६) एकूण उत्पन्न | ४४३.६६ | ४९९.७६ | ५६.१० | १२.६४ |
| ७) स्वनिधी | ६४५.५१ | ७२६.२० | ८०.६९ | १२.५० |

## माहिती तंत्रज्ञान व डिजिटल बँकिंग

आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून ग्राहकांना उत्कृष्ट सेवा सुविधा पुरवण्यासाठी संस्थेने सर्व शाखा कोअर बँकिंग सोल्युशन (सी.बी.एस.) ने जोडणी केल्या आहेत. ग्राहकांना डिजिटल सेवा पुरवणे हे काळाची गरज असल्याने आपण येस बँके मार्फत RTGS, NFFT व IMPS तसेच अपग्रेटेड 'डिजिटल शिवसमर्थ' हे मोबाईल ॲप लवकरच सुरू करीत आहोत.

## सभासद संख्या

आपल्या संस्थेची सभासद संख्या दि.३१ मार्च २०२५ अखेर ७९६७ इतकी होती. त्यामध्ये अहवाल साली नवीन सभासद २५४ झाले असून सदर अहवाल वर्षामध्ये ७० सभासदांनी राजीनामा दिल्यामुळे वर्ष अखेरीस एकूण सभासद संख्या ८१५१ इतकी झाली आहे.

## भाग भांडवल

संस्थेचे अधिकृत भाग भांडवल रू. ५ कोटी असून संस्थेचे वसूल भाग भांडवल वर्षाच्या सुरूवातीला २२६.१२ लाख होते. त्यामध्ये रूपये ४९.२६ लाख ने वाढ झाली. राजीनामा व इतर कारणास्तव रू. ५.३८ लाख ने कमी होऊन वर्ष अखेरील भाग भांडवल रू. २७०.०० लाख इतके झाले आहे.

## राखीव व इतर निधी

सन २०२४-२०२५ अखेरीस राखीव व इतर निधीमध्ये रू. ४१५.०९ लाख जमा होते. अहवाल सालामध्ये रू. ४१.२८ लाखाची वाढ झाली असून सन २५-२६ वर्ष अखेरीस इतर राखीव निधीमध्ये रू. ४५६.३८ लाख जमा आहेत.

| निधीचा प्रकार | ३१ मार्च २०२५ अखेर शिल्लक रू. | ३१ मार्च २०२६ अखेर शिल्लक रू. | अहवाल वर्षात झालेली वाढ / घट |
|---|---|---|---|
| १) राखीव निधी | १,२४,१३,६७९.४७ | १,४१,२९,८८९.१३ | १७,१६,२०९.६६ |
| २) इमारत निधी | १,२३,४५,२७४.२१ | १,६१,०५,२७४.२१ | ३७,६०,०००.०० |
| ३) सुवर्ण महोत्सव निधी | ३,५०,०००.०० | ३,५०,०००.०० | ००.०० |
| ४) संशयीत व बुडीत कर्ज निधी | १,०४,००,०००.०० | ८५,४६,८४८.०० | -१८,५३,१५२.०० |
| ५) सभासद कल्याण निधी | १,४४,०१६.५४ | ५४,५९४.५४ | -८९,४२२.०० |
| ६) कर्मचारी कल्याण निधी | १९,९००.०० | १९,९००.०० | ००.०० |
| ७) उत्तम जिंदगी कर्ज निधी | ८,००,०००.०० | ८,५०,०००.०० | ५०,०००.०० |
| ८) निवडणूक निधी | २,४७,०००.०० | २,४७,०००.०० | ००.०० |
| ९) लाभांश समानीकरण निधी | २,००,०००.०० | २,७५,०००.०० | ७५,०००.०० |
| १०) गुंतवणूक चढउतार निधी | १,३०,०००.०० | १,३०,०००.०० | ००.०० |
| ११)सहकार प्रशिक्षण निधी | ८२,७८२.२१ | ५,५५,७६९.२१ | ४,७२,९८७.०० |
| १२)व्यवसाय वृध्दी निधी | २६,७८,०३३.९३ | २६,७५,१८४.९३ | -२,८४९.०० |
| १३) थकीत कर्ज व्याज निधी | १६,९८,८६२.९४ | १६,९८,८६२.९४ | ००.०० |
| एकूण रूपये | ४,१५,०९,५४९.३० | ४,५६,३८,३२२.९६ | ४१,२८,७७३.६६ |

## बॅंक गुंतवणुक

अहवाल वर्षात संस्थेकडे उपलब्ध झालेला अतिरिक्त निधी अधिकाधिक परतावा मिळणाऱ्या व शासन निकषांची पूर्तता करणाऱ्या महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंक लि., जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक, सक्षम शेडयुल सहकारी बॅंक व सहकारी बॅंकेच्या मुदत ठेवी मध्ये रू. १७७७.०७ लाखांची गुंतवणुक केलेली आहे.

| गुंतवणुकीचा प्रकार | ३१ मार्च २०२५ अखेर शिल्लक रू. | ३१ मार्च २०२६ अखेर शिल्लक रू. | अहवाल वर्षात झालेली वाढ / घट |
|---|---|---|---|
| १) दि ठाणे जि.म.स.बॅंक भाग | ५,०००.०० | ५,०००.०० | ०.०० |
| २) दि ठाणे जि.ना.स.प.फेड | १,०००.०० | १,०००.०० | ०.०० |
| ३) समर्थ को.ऑप क्रे.सो. भाग | ५००.०० | ५००.०० | ०.०० |
| ४)ग्रोहितम हौ.सोसायटी भाग | ५००.०० | ५००.०० | ०.०० |
| ५) महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन-पुणे | ३,०००.०० | ३,०००.०० | ०.०० |
| ६)महा. रा. बी. कृ.स.प.फे.मुंबई | ००.०० | १,०००.०० | १,०००.०० |
| ७) दि ठाणे जि.म.स.बॅंक निधी गुंतवणुक | १,४६,४४,४१४.०० | १,६२,८७,१८६.०० | १६,४२,७७२.०० |
| ८) सारस्वत को. ऑप.बॅंक | १,८५,००,०००.०० | १,९५,००,०००.०० | १०,००,०००.०० |
| ९) जी.पी.पारसिक सह.बॅंक | २,०५,००,०००.०० | ३,३०,७१,२१५.०० | १,२५,७१,२१५.०० |
| १०) दि ठाणे जनता स.बॅंक | १,८५,००,०००.०० | १,८४,३८,१८२.०० | -६१,८१८.०० |
| ११) दि ठाणे जि.म.स.बॅंक | ३,०४,००,०००.०० | २,९४,००,०००.०० | -१०,००,०००.०० |
| १२) एस.व्ही.सी. बॅंक को.ऑप.बॅंक | ५०,५८,४१९.०० | २०,००,०००.०० | -३०,५८,४१९.०० |
| १३) डी.एम.के जावली सह बॅंक | ५०,००,०००.०० | ३०,००,०००.०० | -२०,००,०००.०० |
| १४) दि एम.एस.सी. बॅंक | २,४०,००,०००.०० | ३,२०,००,०००.०० | ८०,००,०००.०० |
| १५) कॉसमॉस को. ऑप. बॅंक | १,९०,००,०००.०० | १,९०,००,०००.०० | ००.०० |
| १६) मुंबई जि.म.ऑप. बॅंक | ००.०० | ५०,००,०००.०० | ५०,००,०००.०० |
| **एकूण रुपये** | **१५,५६,१२,८३३.००** | **१७,७७,०७,५८३.००** | **२,२०,९४,७५०.००** |

## सभासद ठेवी

संस्था आणि सभासद यांच्यातील विश्वास कायम राहण्यासाठी कटिबध्द असणे हे सर्व संचालक,कर्मचारी व ठेव प्रतिनिधी यांचे आद्यकर्तव्य आहे. त्याच दृष्टीकोनातून संस्थेची वाटचाल सुरू आहे. संस्थेकडे विविध प्रकारच्या आकर्षक ठेव योजना आहेत. संचालक, कर्मचारी व दैनंदिन ठेव प्रतिनिधी यांची ग्राहक सेवा यामुळे आपल्या संस्थेच्या ठेवी मध्ये सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात रू. ६७३.७६ लाख इतकी वाढ झाली असून संस्थेच्या ठेवी रु ३९२०.९० लाखांवरून रू. ४५९४.६६ लाख इतक्या झाल्या आहेत. ठेव वृध्दीचा दर १७.१८% असून ठेवीमध्ये सातत्याने होत असलेली वाढ हेच ठेवीदारांनी आपल्या संस्थेवर दाखविलेल्या दृढ विश्वासाचे प्रतिक आहे.

| ठेव प्रकार | ३१ मार्च २०२५ अखेर शिल्लक रू. | ३१ मार्च २०२६ अखेर शिल्लक रू. | अहवाल वर्षात झालेली वाढ / घट |
|---|---|---|---|
| १) बचत ठेव | ४,५१,३७,१४७.१७ | ४,३४,८५,५६६.१४ | -१६,५१,५८१.०३ |
| २) दैनंदिन ठेव | २,८९,६०,०६१.०० | ४,०३,८७,९८०.०० | १,१४,२७,९१९.०० |
| ३) आवर्त ठेव | ८२,५१,२२४.०० | १,०५,९७,६२६.२२ | २३,४६,४०२.२२ |
| ४) मुदत ठेव | २९,७२,१२,०१९.०० | ३५,१४,४०,२५१.०० | ५,४२,२८,२३२.०० |
| ५) लखपती ठेव | १,२२,३०,४७५.०० | १,३२,१३,९६७.०० | ९,८३,४९२.०० |
| ६) दैनंदिन प्रतिनीधी सुरक्षा ठेव | २,९९,३६८.०० | ३,४१,३२६.०० | ४१,९५८.०० |
| एकूण रूपये | ३९,२०,९०,२९४.१७ | ४५,९४,६६,७१६.३६ | ६,७३,७६,४२२.१९ |

## सभासद कर्ज

कर्जव्यवहार हा संस्थेच्या उत्पन्नाचा मुख्य मार्ग आहे. त्या अनुषंगाने ग्राहकांच्या गरजा लक्षात घेवून विविध कर्ज योजना तयार केल्या आहेत. सभासदांना माफक व्याजदराने कर्जपुरवठा करण्यात येत आहे. अहवाल सालात संस्थेने रू. २५८९.३९ लाख कर्ज वाटप केले असून रू. २१९.८७ लाख कर्जाची वसुली केली आहे. वर्षअखेरीस रू. ३४११.४४ लाख कर्ज येणे बाकी आहे. अहवाल सालात कर्जामध्ये गतवर्षीच्या तुलनेत रू. ३९०.६७ लाखांची वाढ झाली आहे. कर्ज वृध्दीचा दर १२.९३ टक्के असुन सदरची वाढ समाधानकारक आहे. केलेले कर्ज वाटप व झालेल्या कर्ज वसुलीची आकडेवारी यावरून संस्थेने सक्षम कर्जदारांनाच कर्ज वितरण केल्याचे निदर्शनास येते.

| कर्ज प्रकार | ३१ मार्च २०२५ अखेर शिल्लक | अहवाल साली कर्ज वाटप | अहवाल साली कर्ज वसूल | ३१ मार्च २०२६ अखेर शिल्लक |
|---|---|---|---|---|
| १) घर तारण कर्ज | १६,९६,३०,३३३.४० | ३,८४,००,०००.०० | ३,६३,२८,८५१.४० | १७,१७,०१,४८१.०० |
| २) वैयक्तिक कर्ज | ३७,९२,५१५.८० | १३,४०,०००.०० | २०,०३,७६२.९१ | ३१,२८,७५२.८९ |
| ३) वाहन तारण कर्ज | १,१९,१५,००५.०० | २३,२०,०००.०० | ४७,३८,९३२.६० | ९४,९६,०७२.४० |
| ४) ठेव तारण कर्ज | २,४९,१३,८०४.०० | ५,६३,७२,८१२.०० | ६,०३,२२,२३१.०० | २,०९,६४,३८५.०० |
| ५) एल.आय.सी.तारण कर्ज | ४,५९,०३४.०० | ४,४५,०००.०० | ३,१७,६२२.०० | ५,८६,३७२.०० |
| ६) सोने तारण कर्ज | ६,२४,४०,९७८.०० | १४,३७,९२,८००.०० | १०,८९,७०,०७६.०० | ९,७२,६३,७०२.०० |
| ७) कर्मचारी कर्ज | २,१७,१३४.०० | ००.०० | ७४,५६६.०० | १,४२,५६८.०० |
| ८) पगार कपात कर्ज | १,५७,७३,६७९.०० | ७०,०२,०००.०० | ९७,२४,४६४.०० | १,३०,५२,०१५.०० |
| ९) व्यवसाय कर्ज | ९०,४३,८३९.९० | ६०,००,०००.०० | २२,१४,५४३.०० | १,२८,२९,२९६.९० |
| १०) दैनंदिन ठेव तारण कर्ज | ४,१२,३९३.०० | १०,५३,५००.०० | ११,१५,४१७.०० | ३,५०,४७६.०० |
| ११) कर्मचारी कर्ज | ३४,७८,८८६.०० | ००.०० | ३,६३,१११.०० | ३१,१५,७७५.०० |
| १२) ओव्हरड्राफ्ट कर्ज | ००.०० | ८४,६१,४६१.०० | ००.०० | ८४,६१,४६१.०० |
| १३) सखी कर्ज | ००.०० | ५२,४०६.०० | ००.०० | ५२,४०६.०० |
| एकूण रूपये | ३०,२०,७७,६०२.१० | २५,८९,३९,३४९.०० | २१,९८,७२,१८७.९१ | ३४,११,४४,७६३.१९ |

## स्वनिधी

आर्थिक सुदृढतेचे परिणाम असलेला घटक म्हणून संस्थेचा स्वनिधी उत्तरोत्तर वाढत राहणे हे संस्थेच्या स्थैर्यासाठी आवश्यक आहे. दिनांक ३१ मार्च २०२५ अखेर संस्थेचा स्वनिधी रू. ६४५.५१ लाख इतका होता. त्यामध्ये अहवाल वर्षात संस्थेच्या स्वनिधीमध्ये १२.५० टक्के रू. ८०.६९ वाढ होवून दि. ३१ मार्च २०२६ अखेर स्वनिधी ७२६.२० लाख इतका झाला आहे.

## भांडवल निधीचे (स्वनिधीचे)जोखीम भारीत मालमत्तेशी प्रमाण (CRAR)

मा. सहकार आयुक्त व निबंधक कार्यालयाने सहकारी पतसंस्थांसाठी भांडवल निधीचे (स्वनिधीचे) जोखीम भारीत मालमत्तेशी प्रमाणबध्द (CRAR) निकष लागू केले असून त्याचे आदर्श प्रमाण किमान ९% आवश्यक आहे. संस्थेने दि. ३१ मार्च २०२६ अखेर (CRAR) प्रमाण २८.१९ टक्के राखले आहे.

## कर्ज थकबाकीचे व्यवस्थापन

मार्च २०२६ अखेर एकूण येणे कर्जाशी थकबाकीचे प्रमाण २.३४ % इतके आहे. संस्था कर्जाचे वितरण करण्यापुर्वी ते कर्ज थकीत होऊ नये. यासाठी त्याची सर्वांगीण तपासणी करीत असते. त्यातूनही जी कर्ज थकीत होतात, अशा कर्जाच्या वसूलीसाठी संचालक मंडळाने कर्ज वसुली समिती गठित केली आहे. तसेच वसुली विभाग मार्फत सुनियोजित पध्दतीने थकबाकी वसूलीसाठी आखलेले धोरण, वसुली व विक्री अधिकारी, कर्मचारी व दैनंदिन ठेव प्रतिनिधी यांनी केलेल्या अथक प्रयत्नामुळे गतवर्षी मार्च २०२५ अखेर एकूण येणे कर्जाच्या थकबाकीचे प्रमाण २.८९ टक्के इतके होते. मार्च २०२५ च्या तुलनेत चालू आर्थिक वर्षात थकबाकी मध्ये ०.५५ % घट झाली आहे.

## अनुत्पादित कर्ज (एन.पी.ए.) व्यवस्थापन

संस्थेने कर्ज वसुलीबाबत प्रभावी व्यवस्थापन केल्याने अनुत्पादित कर्ज (N.P.A.) नियंत्रणात ठेवली आहेत. मार्च २०२६ अखेर संस्थेचे ढोबळ अनुत्पादित कर्जाचे (Gross N.P.A.) प्रमाण १.८६ टक्के असुन निव्वळ अनुत्पादित कर्जाचे (Net N.P.A.) प्रमाण ०.०० टक्के आहे.

## निव्वळ नफ्याची विभागणी

संस्थेने स्वत:च्या निधींचा व ठेवीद्वारे उपलब्ध झालेल्या रक्कमेचा काटेकोरपणे वापर करून अधिकाधिक सभासदांना पतपुरवठा करून समाधानकारक नफा मिळविला आहे. संस्थेने कर्जाची गुणवत्ता राखत व्यवहार वृध्दीचे धोरण अवलंबिले आहे. तसेच ठेवी व कर्जावरील व्याजदरात काळानुरूप योग्य तो बदल करून ठेव व कर्जवृध्दीवर भर दिला आहे.

मागील वर्षातील रू. १२५८.९८ इतका नफा शिल्लक होता. चालू आर्थिक वर्षांत संस्थेस रू. ६१,१५,८५०.७४ इतका निव्वळ नफा झाला असुन विभागणीसाठी एकूण नफा रु. ६१,१७,१०९.७२ उपलब्ध आहे. आपली संस्था लाभांश वाटप करताना भागधारकांचे हित साधण्याबरोबरच संस्थेचे भांडवल निधी उपलब्ध आहे. आपली संस्था लाभांश वाटप करताना भागधारकांचे हित साधण्याबरोबरच संस्थेचे भांडवल निधी (स्वनिधी) वाढविण्याचा समतोल राखत असुन सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता भाग धारकांना यावर्षी ११ टक्के लाभांश देण्याची शिफारस संचालक मंडळ करीत आहे.

| सन २०२५-२०२६ सालची नफा विभागणी | रूपये |
|---|---|
| राखीव निधी २५ % | १५,२८,९६२.६८ |
| लाभांश (११%) प्रोरेटा | २५,८७,१४३.०० |
| इमारत निधी | १३,००,०००.०० |
| सभासद कल्याण निधी | २,०१,००४.०४ |
| सहकार प्रशिक्षण निधी | १,००,०००.०० |
| लाभांश समानीकरण निधी | २,५०,०००.०० |
| सुवर्ण महोत्सव निधी | ५०,०००.०० |
| कर्मचारी भविष्य निधी | ५०,०००.०० |
| निवडणूक निधी | ५०,०००.०० |
| एकूण रूपये | ६१,१७,१०९.७२ |

## संचालक मंडळ सभा

संस्थेच्या कामकाजातील संचालकांचा सहभाग लक्षणीय असून संस्थेचे दैनंदिन कामकाज करीत असतांना पतसंस्थेचे नियम, पोटनियम व सहकार कायद्याच्या तरतुदी यांचे काटेकोरपणे पालन केले जाते. गरजेनुसार सभासद व कर्मचारी यांच्याशी आपुलकीच्या भावनेने संवाद साधला जातो व सर्वांना बरोबर घेऊन, वेळोवेळी होणारे नवीन बदल स्वीकारून संस्थेस प्रगती पथावर नेण्यासाठी सर्व संचालक मंडळ प्रयत्न करत असते.

अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या एकुण १४ सभा झाल्या व सभेसाठी संचालकांची उपस्थिती आणि कृतीशील सहभाग उल्लेखनिय होता.

## संचालक व नातेवाईक कर्ज

दिनांक ३१ मार्च २०२६ अखेर येणे कर्जा पैकी महाराष्ट्र राज्य सहकारी अधिनियम १९६० चे कलम ७५ (२) नुसार संचालक व नातेवाईक यांना दिलेली कर्जे.

| ३१ मार्च २०२५ रोजी येणे रक्कम | २०२५-२०२६ मधील कर्ज वाटप | २०२५-२०२६ मधील वसूल कर्ज | ३१ मार्च २०२६ येणे कर्ज | ३१ मार्च २०२६ अखेर थकीत कर्ज |
|---|---|---|---|---|
| १,२१,२९,४९२.०० | १,१६,००,०००.०० | ३४,९९,६६९.०० | २,०२,२९,८२३.०० | ००.०० |

## वैयक्तिक भाग भांडवल

आपल्या पतसंस्थेस व्यावसायिक स्पर्धेत टिकण्याकरिता पतसंस्थेचे भाग भांडवल वाढविणे अत्यावश्यक झाले असून त्याकरिता आपले सहकार्य अपेक्षित आहे. सर्व सभासदांनी पतसंस्थेचे यथाशक्ती अधिक भाग (शेअर्स) घेणे आवश्यक असून कमीत कमी १०००/- रुपयांचे भाग (शेअर्स) घ्यावेत ही अपेक्षा आहे. पतसंस्थेचे सर्व सभासद उत्स्फुर्तपणे या आवाहनास प्रतिसाद देतील व संस्थेच्या सर्वांगीण विकासाकरिता हातभार लावतील याबद्दल विश्वास आहे.

संस्थेच्या भरभराटीकरिता सर्व सभासदांनी संस्थेचे भागभांडवल वाढविण्यासाठी आपल्या जवळच्या शाखेत कामकाजाच्या वेळेत त्वरीत संपर्क साधावा ही विनंती. आपणांस प्रत्यक्ष येवून संस्थेत भाग भांडवल भरणा करणे शक्य नसेल तर आमचे कर्मचारी आपल्या निवासस्थानी येऊन भागभांडवल रक्कम (रोख अथवा चेक किमान रु. १०००/- असल्यास) स्विकारतील. तसेच आपणांस शक्य असल्यास ऑनलाईन रक्कम जमा करू शकता.

## लेखापरिक्षण

अ) संस्थेचे सन २०२५/२०२६ या आर्थिक वर्षाचे शासकीय लेखापरिक्षण मे. सीए पद्माकर वाडयेकर आणि कं.सनदी लेखापाल यांनी पूर्ण केले असून संस्थेस लेखापरिक्षण वर्ग ''अ'' प्रदान केला आहे.

ब) संस्थेचे सन २०२५/२०२६ या आर्थिक वर्षाचे अंतर्गत लेखापरिक्षण मे.एम.ए.चव्हाण आणि कं. चार्टर्ड अकौटंट यांनी पूर्ण केले असून संस्थेस लेखापरिक्षणाचा अहवाल सादर केला आहे.

## संचालक व कर्मचारी प्रशिक्षण

संस्था संचालक व कर्मचारी यांच्या ज्ञानवृध्दीसाठी नियमितपणे सहकार विषयावर प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करते. संस्था याद्वारे आपल्या कर्मचारी व अधिकाऱ्यानां प्रशिक्षण देउन सहकारी क्षेत्रात सातत्याने होणारे बदल व संकल्पनांबाबत सजग ठेवते. अहवाल वर्षात संस्थेने कर्मचारी यांना महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था फेडरेशन मुंबई, मार्फत प्रशिक्षण दिले असून वर्षभरात सहकार क्षेत्राशी संबंधित विविध विषयांवर तज्ञ मार्गदर्शकांद्वारे ०८ पशिक्षण सत्रे घेण्यात आली.

## !! भावपूर्ण श्रध्दांजली !!

अहवाल सालामध्ये

भारतातील जे थोर नेते, संशोधक, शास्त्रज्ञ,

तंत्रज्ञ, लेखक, साहित्यिक, कलावंत,

जवान, शिक्षणतज्ञ, देशभक्त,

कवी, सामाजिक कार्यकर्ते, डॉक्टर्स,

आरोग्य कर्मचारी, सुरक्षा कर्मचारी, खेळाडू,

पतपेढीचे सभासद, ठेवीदार,

कर्जदार तसेच संस्थेचे काही ज्ञात व अज्ञात

हितचिंतकांना देवाज्ञा झाली त्यांना शिव समर्थ

सहकारी पतपेढी तर्फे नम्रतापुर्वक

भावपूर्ण श्रध्दांजली.

ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.

जय हिंद ! जय महाराष्ट्र ! जय सहकार !

# शिव समर्थ सहकारी पतपेढी लि.

## ३१ मार्च २०२६ अखेरचे ताळेबंद पत्रक

| ३१/०३/२०२५ रूपये पैसे | LIABILITIES / भाग भांडवल व देणी | ३१/०३/२०२६ रूपये पैसे |
|---|---|---|
| | **SHARE CAPITAL / भाग भांडवल** | |
| २,५०,००,०००.०० | AUTHORISED SHARE CAPITAL / अधिकृत भाग भांडवल | ५,००,००,०००.०० |
| २,२६,१२,६००.०० | PAID UP SHARE CAPITAL / वसूल भाग भांडवल | २,७०,००,०००.०० |
| | **RESERVES FUND & OTHER RESERVES राखीव व इतर निधी** | |
| १,२४,१३,६७९.४७ | RESERVE FUND / राखीव निधी | १,४१,२९,८८९.१३ |
| १,२३,४५,२७४.२१ | BUILDING FUND / इमारत निधी | १,६१,०५,२७४.२१ |
| ३,५०,०००.०० | GOLDEN JUBILEE FUND / सुवर्ण महोत्सव निधी | ३,५०,०००.०० |
| १,०४,००,०००.०० | BAD AND DOUBTFUL DEBTS / बुडीत व संशयित कर्ज निधी | ८५,४६,८४८.०० |
| १,४४,०१६.५४ | MEMBERS WELFARE FUND / सभासद कल्याण निधी | ५४,५९४.५४ |
| १९,९००.०० | STAFF WELFARE FUND / कर्मचारी कल्याण निधी | १९,९००.०० |
| ८,००,०००.०० | STANDARD NPA PROV / उत्तम जिंदगी कर्ज निधी | ८,५०,०००.०० |
| २,४७,०००.०० | ELECTION FUND / निवडणूक निधी | २,४७,०००.०० |
| २,००,०००.०० | DIVIDEND EQUALISATION FUND / लाभांश समीकरण निधी | २,७५,०००.०० |
| १,३०,०००.०० | INVESTMENT FLUCTUATION FUND / गुंतवणुक चढउतार निधी | १,३०,०००.०० |
| ८२,७८२.२१ | CO-OP EDUCATION & TRAINING FUND / सहकार प्रशिक्षण निधी | ५,५५,७६९.२१ |
| २६,७८,०३३.९३ | DEVELOPMENT FUND / व्यवसाय वृध्दी निधी | २६,७५,१८४.९३ |
| १६,९८,८६२.९४ | OVERDUE INTEREST RESERVE FUND / थकीत व्याज निधी | १६,९८,८६२.९४ |
| ४,१५,०९,५४९.३० | | ४,५६,३८,३२२.९६ |
| | **DEPOSITS / ठेवी** | |
| ४,५१,३७,१४७.१७ | SAVING DEPOSIT / बचत ठेव | ४,३४,८५,५६६.१४ |
| ८२,५१,२२४.०० | RECURRING DEPOSITS / आवर्त ठेव | १,०५,९७,६२६.२२ |
| १,२२,३०,४७५.०० | LAKHPATI THEV YOJANA / लखपती ठेव योजना | १,३२,१३,९६७.०० |
| २९,७२,१२,०१९.०० | FIXED DEPOSIT / मुदत ठेव | ३५,१४,४०,२५१.०० |
| २,८९,६०,०६१.०० | SANCHAYATI DEPOSIT SCHEME / दैनंदिन ठेव | ४,०३,८७,९८०.०० |
| २,९९,३६८.०० | SECURITY DEPOSITS (AGENT) / सुरक्षित ठेव (दैनंदिन प्रतिनिधी) | ३,४१,३२६.०० |
| ३९,२०,९०,२९४.१७ | | ४५,९४,६६,७१६.३६ |
| | | |
| ४५,६२,१२,४४३.४७ | **BALANCE C/F / पुढील पानावर** | ५३,२१,०५,०३९.३२ |

# शिव समर्थ सहकारी पतपेढी लि.

## ३१ मार्च २०२६ अखेरचे ताळेबंद पत्रक

| ३१/०३/२०२५ रूपये पैसे | ASSETS / मालमत्ता व येणी | ३१/०३/२०२६ रूपये पैसे |
|---|---|---|
| | **CASH IN HAND / रोख शिल्लक** | |
| ९,१५,५८२.२० | CASH IN HAND / रोख शिल्लक | ९,५५,७०५.०० |
| ९,१५,५८२.२० | | ९,५५,७०५.०० |
| | **BANK BALANCE / बँक शिल्लक** | |
| २०,०२७.३८ | T.D.C.C BANK CA / चालू खाते ठाणे जि.म.स.बँक लि. | ३३,०९३.३८ |
| ८,८६,२४७.३१ | G.P. PARSIK BANK CA / चालू खाते जी.पी.पारसिक बँक | ७७,८५,५३३.७५ |
| ७,४६,८०५.३७ | TDCC BANK SAVING A/C / बचत खाते ठाणे जि.म.स.बँक लि. | ७,१८,८२०.४७ |
| ३,६७९.०० | ABHYUDAYA BANK (EMPLOYEE GG) / बचत खाते अभ्यु.बँक ग्रॅज्युंइटी | ३,७७७.०० |
| ५०,६३१.१२ | UNION BANK CA / चालू खाते युनियन बँक | ५७,३५०.३१ |
| ३,०५,७२६.८४ | SARASWAT CO-OP BANK / चालू खाते सारस्वत बँक | ६६,८८९.७५ |
| ५२,१६५.०० | SVC CO-OPERATIVE BANK LTD / चालू खाते शामराव विठ्ठल बँक | १,०७,९७२.०० |
| ४,२८,५९२.०० | MSC BANK SB A/C / बचत खाते महाराष्ट्र स्टेट को.ऑ.बँक | ५,०७,४०१.०० |
| ०.०० | MUMBAI DIST. CEN. CO-OP BANK A/C / मुंबई जिल्हा मध्य.सह. बँक लि. | २,५००.०० |
| ०.०० | YES BANK / एस बँक | १०,००,०००.०० |
| ०.०० | G.P.PARSIK BANK OD / ओडी जी.पी.पारसिक बँक | २,१९,२७२.४६ |
| २४,९३,८७४.०२ | | १,०५,०२,६१०.१२ |
| | **INVESTMENTS IN SHARES / शेअर्स गुंतवणूक** | |
| ५,०००.०० | T.D.C.C. BANK / ठाणे जि.म.स.बँक लि. | ५,०००.०० |
| १,०००.०० | TDNSPF LTD / ठाणे जि.ना.सह.पत.फेड. लि. | १,०००.०० |
| ५००.०० | SAMARTH CO.OP.CREDIT SO. / समर्थ को.ऑ.क्रे.सो. | ५००.०० |
| ५००.०० | GROHITAM CHS / ग्रोहितम को.हौ.सोसायटी | ५००.०० |
| ३,०००.०० | MRSPF / महाराष्ट्र रा. सह.पत.फेड. लि.- पुणे | ३,०००.०० |
| | MRSPF / महाराष्ट्र रा. सह.पत.फेड. लि.- मुंबई | १,०००.०० |
| १०,०००.०० | | ११,०००.०० |
| | **INVESTMENT FOR FUNDS / राखीव व इतर निधी पोटी गुंतवणूक** | |
| १,२४,६४,४१४.०० | RESERVE FUND - TDCC BANK / राखीव निधी ठाणे जि.म.स.बँक.लि. | १,४१,०७,१८६.०० |
| २१,८०,०००.०० | OTHER FUND - TDCC BANK / इतर निधी ठाणे जि.म.स.बँक.लि. | २१,८०,०००.०० |
| १,४६,४४,४१४.०० | | १,६२,८७,१८६.०० |
| | | |
| १,८०,६३,८७०.२२ | **BALANCE C/F / पुढील पानावर** | २,७७,५६,५०१.१२ |

# शिव समर्थ सहकारी पतपेढी लि.

## ३१ मार्च २०२६ अखेरचे ताळेबंद पत्रक

| ३१/०३/२०२५ रूपये पैसे | LIABILITIES / भाग भांडवल व देणी | ३१/०३/२०२६ रूपये पैसे |
|---|---|---|
| ४५,६२,१२,४४३.४७ | मागील पानावरून | ५३,२१,०५,०३९.३२ |
| | **OTHER LIABILITIS / इतर देय** | |
| ११,६७७.०० | TDS PAYABLE / टी.डी.एस. देय | १२,५४१.०० |
| ७,८०,०००.०० | OFFICE DEPOSIT PAYABLE / कार्यालयीन अनामत देय | ६,३०,०००.०० |
| १,४८,३६०.०० | BONUS PAYABLE / बोनस देय | १,४२,४९२.०० |
| १,४००.०० | PROFESSIONAL TAX PAYABLE / व्यवसाय कर देय | १,४००.०० |
| २,५३,८१८.०० | AUDIT FEES PAYABLE / लेखापरिक्षण फी देय | ३,२०,०००.०० |
| २,५०,८४१.०० | SUNDRY CREDITORS / इतर विविध देणी | १९,२९६.०० |
| ६३,१९९.३० | GST PAYABLE / वस्तू व सेवा कर देय | ४८,९३४.१६ |
| २,५१०.०८ | OTHER PAYABLE / इतर देय | ००.०० |
| ००.०० | INOP A/C RD/LAKHPATI / निष्क्रिय खाते आवर्त /लखपती ठेव | ५००.०० |
| ००.०० | ESIC PAYABLE / इ.एस.आय.सी. देय | १,२३१.०० |
| १५,११,८०५.३८ | | ११,७६,३९४.१६ |
| | **BANK OVERDRAFT / बँक ओ.डी.** | |
| ४२,४२,९६९.१६ | **G.P.PARSIK BANK / जी.पी. पारसिक बँक** | ००.०० |
| | **INTEREST PAYABLE PROVISIONS / देय व्याज तरतूद** | |
| १,५०,२३,१४१.०० | DEPOSIT INTEREST / ठेवीवरील देय व्याज | १,५१,२४,६६५.०० |
| | **DIVIDEND PAYABLE / लाभांश देय** | |
| ३,८६,९७१.०० | DIVIDEND 23-24 / लाभांश २३-२४ | १,७५,०९५.०० |
| ००.०० | DIVIDEND 24-25 / लाभांश २४-२५ | १,४५,१०९.०० |
| ३,८६,९७१.०० | | ३,२०,२०४.०० |
| | **NPA PROVISION / बुडीत व संशयित कर्ज तरतुद** | |
| २३,५३,६५६.०० | PROV. BAD & DOUBTFULL DEBTS / अतिरिक्त तरतुद बुडीत व संशयित कर्ज निधी | २३,५३,६५६.०० |
| | **OTHER PROVISION / इतर तरतुदी** | |
| ४३,१४,३३६.०० | अ) OIR / थकीत कर्ज व्याज तरतुद | ३३,७५,५१४.०० |
| | **PROFIT & LOSS A/C / नफा - तोटा खाते** | |
| | LAST YEAR BAL. PROFIT / मागील नफा शिल्लक | १,२५८.९८ |
| ५९,४९,४४२.६४ | CURRENT YEAR PROFIT / चालू वर्षाचा नफा | ६१,१५,८५०.७४ |
| ५९,४९,४४२.६४ | | ६१,१७,१०९.७२ |
| ४८,९९,९४,७६४.६५ | **BALANCE C/F / पुढील पानावर** | ५६,०५,७२,५८२.२० |

# शिव समर्थ सहकारी पतपेढी लि.

## ३१ मार्च २०२६ अखेरचे ताळेबंद पत्रक

| ३१/०३/२०२५ रूपये पैसे | ASSETS / मालमत्ता व येणी | ३१/०३/२०२६ रूपये पैसे |
|---|---|---|
| १,८०,६३,८७०.२२ | मागील पानावरून | २,७७,५६,५०१.१२ |
| | **INVESTMENT IN BANK FD / बँक गुंतवणुक मुदत ठेव** | |
| १,८५,००,०००.०० | FDR WITH SARASWAT BANK / मुदत ठेव सारस्वत बँक | १,९५,००,०००.०० |
| २,०५,००,०००.०० | FDR WITH PARSIK BANK / मुदत ठेव जी.पी.पारसिक बँक | ३,३०,७१,२१५.०० |
| १,८५,००,०००.०० | FDR WITH TJSB BANK / मुदत ठेव टी.जे.एस.बी.बँक | १,८४,३८,१८२.०० |
| ३,०४,००,०००.०० | FDR WITH TDC / मुदत ठेव ठाणे जि.म.स.बँक लि. | २,९४,००,०००.०० |
| ५०,००,०००.०० | FDR WITH DMK JAOLI BANK / मुदत ठेव डी.एम.के.जावली सह.बँक | ३०,००,०००.०० |
| २,४०,००,०००.०० | FDR WITH MSC BANK / मुदत ठेव महाराष्ट्र स्टेट को.ऑप. बँक | ३,२०,००,०००.०० |
| ५०,५८,४१९.०० | FDR WITH SVC BANK / मुदत ठेव एस. व्ही. सी. | २०,००,०००.०० |
| १,९०,००,०००.०० | FDR WITH COSMOS BANK / मुदत ठेव कॉसमॉस बँक | १,९०,००,०००.०० |
| ००.०० | FDR WITH MUMBAI DIST / मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक | ५०,००,०००.०० |
| १४,०९,५८,४१९.०० | | १६,१४,०९,३९७.०० |
| | **LOANS / कर्जे** | |
| १६,९६,३०,३३३.४० | LOAN PROPERTY (MORTGAGE) / स्थावर मालमत्ता तारण कर्जे | १७,१७,०१,४८१.०० |
